# निषेधाची काळी साडी नेसून बानो म्हणाली हम देखेंगे!

# आणि हुकूमशहा झिया हादरला! आता पुन्हा तीच वेळ आलीय

संपादकीय
जयश्री खाडिलकर-पांडे

देशात कोणतीही निवडणूक असो ती महत्त्वाची असते. कारण आपण ज्याला निवडून देतो त्याच्या हातात आपण स्वत:चे व देशाचे भवितव्य सोपवीत असतो. त्याचबरोबर निवडणूक महत्त्वाची असते कारण निवडणूक होणे हे आपल्याला निवडीचे स्वातंत्र्य अजूनही आहे याचे प्रतीक आहे. त्यामुळे ज्या देशात निवडणूक होते तिथे आपले मत मांडणार आहोत हा विचार पेटला पाहिजे आणि जिथे निवडणुका नाहीत तिथे आपले स्वातंत्र्य हिरावून घेतले आहे याचा मस्तकी शूळ उठला पाहिजे. शेवटी निवडणूक म्हणजे काय असते? जो सत्तेवर आहे त्याने चांगले कर्म केले असेल तर त्याला बक्षीस द्यायचे आणि जर चांगले कर्म केले नसेल तर त्याला शिक्षा द्यायची असते. होय, कौतुक जितके महत्त्वाचे आहे तितकीच अपराधाला शिक्षा होणे महत्त्वाचे आहे. जो सत्तेवर बसला आहे त्याने जर अपराध केला असेल तर त्याला त्वरित शिक्षा झालीच पाहिजे. आधीचा वाईट होता आणि आताचाही वाईट आहे असे म्हणत जर आपण शांत राहिलो तर मग वाईटाचा आणखी वाईट होतो, कुकर्म केल्यावरही सत्ता राहिली तर गुर्मी वाढते. कसेही वागले तर चालते याची मस्ती वाढते आणि हेच सर्वात घातक ठरते. आधीचा ठग होता म्हणत नंतरच्या ठगावर पांघरुण घातले तर नंतरचा ठग बेफाम, बेलगाम, बेफिकीर होतो. त्याच्या हातून उन्माद घडू शकतो. यासाठीच अपराध करणाऱ्या प्रत्येकाला वेळच्या वेळी ठेचून त्याची जागा त्याला दाखवणे गरजेचे असते.

हेच महत्त्वाचे कार्य दशकानुदशके कवी, शायर, साहित्यकार, कलाकार करीत आले आहेत. सामान्य माणूस राजकारण्यांवर विश्वास ठेवायला तयार नसतो. त्यामुळे नेत्यांच्या भाषणाने त्याचे मत बनत नाही. पण जे कोणत्याही बाजूला कधी झुकलेले नसतात अशी आदर्श व्यक्तिमत्त्व त्यांचे मत जाहीरपणे मांडतात तेव्हा सामान्य माणूस त्यांच्या वक्तव्यावर विचार तरी करतो. महान साहित्यिक पु.ल.देशपांडे यांनी कोणत्या उमेदवाराला निवडून आणायचे ते एका निवडणुकीत जाहीर केले होते, संयुक्त महाराष्ट्र चळवळीत शाहीर अमर शेखांचा डफ वाजला की क्रांतिकाऱ्यांचे रक्त सळसळायचे. जे भारतात घडत होते तेच चित्र पाकिस्तानात होते. भारतात जन्म घेतलेली इक्बाल बानो विवाह करून पाकिस्तानला गेल्यावर तिची गाणी, शायरी, गझलांनी पाकिस्तानी मोहित झाले होते. त्यांच्या हृदयावर ती राज्य करीत होती आणि म्हणूनच काळ्या रंगाची सिल्कची साडी नेसून आपल्या ५० हजार चाहत्यांसमोर ती 'हम देखेंगे' म्हणाली तेव्हा त्या एका क्षणाने पाकिस्तानचा हुकूमशहा राज्यकर्ता झिया उल हकची खुर्ची हादरली.



हा १९७८ चा काळ आहे. पाकिस्तानात झिया उल हकची हुकूमशाही होती. वर्तमानपत्र, रेडिओ, टीव्ही सर्वांची मुस्कटदाबी होती. सार्वत्रिक निवडणुका जाहीर करायच्या आणि रद्द करायच्या असा खेळ सुरू होता. जे जे विद्रोही होते त्यावर बंदी होती. निषेधाचा काळा रंग कुठे दिसता कामा नये असे फर्मान होते. क्रांतिकारी गझल आणि नज्म लिहिणारे डाव्या विचारांचे पाकिस्तानी कवी फैज अहमद फैज यांची एकही ओळ म्हणायची नाही असा आदेश होता. झिया उल हक यांच्या हुकूमशाहीच्या विरोधात, त्यांच्या दडपशाहीच्या विरोधात जनतेच्या मनात आग धगधगत होती. पण उघडपणे बोलण्याची कुणाचीच हिंमत होत नव्हती. १९८४ साली फैज अहमद फैज यांचा मृत्यू झाला, तोपर्यंतही तीच स्थिती होती.

त्यांच्या पहिल्या पुण्यतिथीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. लाहोरच्या अलहमरा ऑडिटोरियममध्ये त्यांचे ५० हजार चाहते बसले होते. पण हुकूमशहाचे फर्मान तोडण्याची हिंमत कुणी करील अशी स्थिती नव्हती. तेवढ्यात सळसळती काळी रेशमी साडी नेसून इक्बाल बानो व्यासपीठावर आली. काळ्या रंगावर बंदी असतानाही तिने काळी साडी नेसली हे पाहून समोर बसलेले ५० हजार प्रेक्षक थक्क झाले. त्यांच्या हृदयातील हुकूमशाही विरोधातील घुसमटीची त्याच क्षणी बारीकशी ठिणगी बनली.

त्यानंतर जे घडले तो चमत्कार होता. इक्बाल बानो यांनी फैज अहमद फैज यांच्या गझल गीतांचे स्मरण केले आणि तिच्या तोंडून पहिले खणखणीत शब्द बाहेर पडले, 'हम देखेंगे'! ते शब्द बाहेर पडले आणि टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. त्या दोन शब्दांनी उघड झाले की, हे गीत गाऊन इक्बाल बानो थेट झिया उल हक यांच्या हुकूमशाही राजवटीला आव्हान देणार होती. ती पुढे गजल गात म्हणाली, हम देखेंगे। लाजिम है (आवश्यक आहे) की हम भी देखेंगे। वो दिन के जिस का वादा है। जो लोह-ए-अजल में लिखा है। (जे वचन अनंतकाळाच्या पाटीवर लिहिले आहे ते आम्हाला बघायचेच आहे) इक्बाल बानो एकेक ओळ गात गेली आणि वातावरण पेटत गेले. जब जुल्मे सितम के कोहे गरां, रुई की तरह उड जाएंगे । (जेव्हा अत्याचाराचे डोंगर कापसासारखे उडून जातील) ये धरती धड धड धडकेगी । (आणि राज्यकर्त्यांच्या डोक्यावर) जब बिजली कडकड कडकेगी। हम देखेंगे। या ओळी ऐकून त्या ५० हजार लोकांचे रक्त खवळले, टाळ्यांच्या कडकडाटाने आकाशच जणू भेदले जात होते. या अभूतपूर्व प्रतिसादातही इक्बाल बानोने संयम ढळू दिला नाही, आवाजाची फेक तशीच कायम राखली, तिला हुकूमशाहीच्या विरोधात वणवा पेटवायचा होता आणि तिचे गाणे अचूक वेध घेत होते.

ती पुढे म्हणाली- हम देखेंगे, सब ताज उच्छाले जाएंगे, सब तख्त (सिंहासन) गिराए जाएंगे, हम देखेंगे! आता लोक बेभान झाले. हुकूमशाहीने ज्यांचा कोंडमारा केला होता त्यांच्याच पेटलेल्या मनातून क्रांती प्रगटली. न राहून त्या अख्ख्या ५० हजाराच्या गर्दीने 'इन्कलाब झिंदाबाद'च्या घोषणा सुरू केल्या. आणि मग बानो शेवटच्या ओळींकडे आली-हम देखेंगे, जब राज करेगी खल्क ए खुदा (जेव्हा देवाचे राज्य येईल) जो मैं भी हूं और तुम भी हो (जे मी आहे आणि तुम्ही पण आहात), हम देखेंगे।

फैज अहमद फैज यांची ही गजल आणि इक्बाल बानोने केलेल्या उघड विद्रोहाने तरुण वर्गात क्रांतीची लहर पेटली. त्याच रात्री या कार्यक्रमाच्या लाखो ऑडियो कॅसेट करून लाहोरपासून पार दिल्लीपर्यंत वाटण्यात आल्या. दुसऱ्या दिवशी सकाळी इक्बाल बानोच्या सर्व कार्यक्रमांवर बंदी घालण्यात आली, पण पेटलेली आग विझवता आली नाही. इक्बालचे छुपे कार्यक्रम होऊ लागले आणि झिया उल हकच्या हुकूमशाहीला विरोध वाढत गेला. १९८५ साली हा कार्यक्रम झाल्यानंतर तीनच वर्षांत १९८८ साली झिया उल हकचा संशयास्पद विमान अपघातात मृत्यू झाला.

पाकिस्तानात झिया उल हकच्या आधी बेनझीर भुत्तोचे सरकार होते. दोन्ही सरकारांवर जनता नाराज होती. दोन्ही सरकारना जनतेने विरोध केला. झिया उल हकच्या हुकूमशाही विरोधात तर वातावरण पेटले होते. जो सत्तेवर असतो त्याने उत्तम कार्य केले तर त्याचे कौतुक व्हावे, पण जर त्याने चुका केल्या असतील तर त्याला लगेच शिक्षा झाली पाहिजे. त्याने कमी चुका केल्या म्हणून माफी दिली तर पुढे जाऊन त्याच्या अहंकारातून मोठ्या चुका घडतील हे त्रिकाल सत्य आहे.

भारतात आता तीच वेळ आली आहे. कोण बरोबर, कोण चूक हे नि:पक्षपणे सांगणारा फैज आणि बानो यांच्यासारखा कुणी दिसत नाही. पण आपण माकड नाही. आपल्याला तल्लख बुद्धी दिली आहे आणि कोणतीही माहिती शोधू शकू असे गुगलसारखे हत्यार दिले आहे. त्याचा वापर करून खंबीरपणे निर्णय घ्यायचा आहे. चुकीला माफी नाही हे बजावून सांगायचा हक्क म्हणजेच लोकशाही आहे. या लोकशाहीचा आदर करायला हवा.